स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक **16–05–2011** रोजी दुपारी **03–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 10. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 11. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 12. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 13. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 14. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 15. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 16. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 03</u> :– मे. आर्या कम्युनिकेषन, मे. कारटेल आउटडोअर ॲडव्हरटायजींग प्रा.ली. व मे. सेल ॲडस् व यांचेवर असलेल्या बकाया बाबतच्या आक्षेपाचे निराकरण करण्यास्तव घेणे असलेल्या मुळ रकमेच्या 50: रक्कम प्रथम जमा करावी लागेल या अटीवर Arbitrator ची नियुक्ती करुन त्यावर निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 04</u> :– वार्ड क्र. 109 येथील सूरेंद्रनगर मैदानाचे परिसरातील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रुपये 22,34,320/– च्या प्राकलणास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन दिनांक 25.05.2011 पासून राष्ट्रीय बॉस्केट बॉल स्पर्धा असल्यामुळे कामाची निकड लक्षांत घेता लघू निविदा काढण्याच्या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली. .

<u>ठराव क्रमांक 05</u> :– वार्ड क्र. 119 येथील म.न.पा. शाळा सोमलवाडा ते गुंजन अपार्टमेंट पर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यांत आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. एस. के. गुरुबक्षानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 28.12 टक्के कमी दराची रु. 10,77,958/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 06</u> :– वार्ड क्र. 80 सिताबर्डी येथील ठिकठिकाणी डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. एस. के. गुरुबक्षानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 28.28 टक्के कमी दराची रु. 10,75,793/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 07</u> :– वार्ड क्र. 72 महावीर वार्ड अंतर्गत 100, 150 मि.मि. व्यासाच्या जलवाहिण्या टाकून पाणीपुरवठयात सुधारणा करण्याच्या कामाकरीता ई–निविदा बोलविल्या असता प्राप्त एकुण 4 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. अमित कंन्स्ट्रक्शन यांची 14.63 टक्के कमी दराची रु. 10,24,370/– ची निम्नतम ई–निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 08</u> :– बुधवारी कॉम्प्लेक्स येथील बेसमेंटमध्ये असलेले पॅनल व सप्लाय पॉईन्ट पहिल्या माळयावर स्थानांतरीत करणे या कामाच्या रु. 19,75,223/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 09</u> :– नागपूर शहरात रुपये 101.18 कोटी सिमेंट कॉक्रीटचे रस्ते तयार करण्याच्या कामांकरीता 'ई' निविदा मागविली

असता, एकुण प्राप्त पाच निविदापैकी युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट लिमिटड (Unity Infrproject Ltd.) यांनी सादर केलेली प्राकलनिय दरापेक्षा 23.40 टक्के कमी दराची रुपये 77,50,61,352/– (रुपये सत्यात्त्र कोटी, पन्नास लाखए ऐकसष्ट हजार, तिनशे बावन्न) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 10</u> :— वार्ड क्र. 81, येथे रामदासपेठ, कॅनाल रोडवर रसकुंज पासून शबरीर्पत डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. एस.के. गुरुबक्षानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 25.21 टक्के कमी दराची रू.11,21,753/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 11</u> :— नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील लहान/मोठे नाले सफाई करण्याकरिता दोन नग Chain Crawler Excavator/ Dozer इंजिन पावर क्षमता 125 PS, बॅकेट क्षमता 1.20 Cum, 1 नग व इंजिन पावर क्षमता 39.9 HP, बॅकेट क्षमता 0.19 Cum, 1 नग खरेदी करण्याकरिता दुसऱ्यादा ई निविदा (Re-e-Tender) मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मंजूरी प्रदान करणे.

<u>ठराव क्रमांक 12</u> :— नागपूर महानगरपालिकेच्या (1) मोक्षधाम व (2) अंबाझरी डिझल शवदाहिनीचे रुपांतर L.P.G. मध्ये करण्यासाठी दोनदा निविदा मागविण्यात आल्या असता मे. चिरंतन उद्योग, ठाणे यांचीच एकमेव निविदा प्राप्त झाली. डिझल दाहिनी चे L.P.G. मध्ये रुपांतर करण्यासाठी प्रति दाहीनी, प्राकलनीय दरा पेक्षा 10 टक्के जास्त दर प्राप्त झाले असता वाटाघाटी दरम्यान निविदाकाराने प्राकलनीय दरापेक्षा 5 टक्के जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शविली असल्यामुळे प्रती शवदाहीनीचे दर रु. 12,08,542/– प्रमाणे दोन शवदाहीनीचे रुपांतर L.P.G. मध्ये करण्यासाठी एकुण रु. 24,17,085/– खर्च अपेक्षीत राहिल. उक्त काम निविदेच्या दरपत्रकात नमूद अर्टी शर्ती प्रमाणे करुन घेण्यात येऊन होणारा खर्च आय–व्यय पद क्र. 343/605 मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 13</u> :— आरोग्य विभागाच्या विविध झोन अंतर्गत नाल्याच्या प्रवाहातील रेता/गाळ/कचरा इत्यादी काढण्यासाठी विविध क्षमतेचे Chain mounted excavator/Robot Excavator मशीन प्रति दिवस/महिना/वर्ष प्रमाणे भाडेतत्वावर घेण्यासाठी निविदा मागवून ऐक वर्षाच्या दरकरार मान्य करुन यावर होणारा वार्षीक अंदाजीत खर्च 50 लक्ष खर्च आय–व्यय पद क्र. 214 मधून किंवा इतर उपलब्ध प्रावधानातून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 14</u> :— कन्हान नदीवर, कन्हान जलशुध्दीकरण केन्द्राजवळ कन्हान–कोलार बंधाऱ्याचे सविस्तर सर्व्हेक्षणाचे कामाकरीता लागणाऱ्या रु. 24.77 लक्षचे सुधारीत खर्चास, प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व या

कामास्तव, स्थायी समिती ठराव क्र. 903, दिनांक 11.03.2011 अन्वये प्रदान करण्यात आलेले रु. 16.00 लक्ष वगळता, उर्वरीत रु. 8.77 लक्षचे प्रदान आय–व्यय पद क्र. 730 मधून, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे व जलविद्युत प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर यांस करण्याकरीता मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 15</u> :– गांधीसागर सरोवरांचे पुनर्जिवन करण्याकरीता राज्य शासनाने मंजूरी प्रदान केली आहे. या प्रकल्पाची निविदा राशी रु. 17164626.00 एवढी असून प्राकलन दर 2008–2009 चे दरसुचीवर आधारीत आहे.

रितसर निविदा मागविण्यात आले असता निम्नतम निविदाकार मे. आर.एम. गोपलानी यांची निम्नतम निविदा 33.30 टक्के ने जास्त आहे. निविदाकाराशी प्रथम वाटाघाटी केले असता, निविदाकाराने 18.58 टक्के ने जास्तीचे दरावर काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे.

निविदा काराशी पुन्हा चर्चा केल्यानंतर निविदाकाराने 13.18 टक्के ने जास्त दरावर काम करण्याची इच्छा दर्शविली आहे. या दराची तुलना डी.एस.आर. 2010–2011 चे दरसुची प्रमाणे केल्यास 1.0 टक्के ने कमी आहे.

सबब, निम्नतम निविदाकार मे.आर.एम. गोपलानी यांची 1.0 टक्के ने कमी असलेली (2010–2011 चे दरसुची प्रमाणे) रु. 1,94,26,924/– ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 16</u> :– सोनेगांव सरोवरांचे पुनर्जिवन करण्याकरीता राज्य शासनाने मंजूरी प्रदान केली आहे. या प्रकल्पाची निविदा राशी रु. 31234384.00 एवढी असून प्राकलन दर 2008–2009 चे दरसुचीवर आधारीत आहे.

रितसर निविदा मागविण्यात आली असता निम्नतम निविदाकार मे. आर.एम. गोपलानी यांची निम्नतम निविदा 30.30 टक्के ने जास्त आहे. निविदाकाराशी प्रथम वाटाघाटी केले असता, निविदाकाराने 24.51 टक्के ने जास्तीचे दरावर काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे.

निविदा काराशी पुन्हा चर्चा केल्यानंतर निविदाकाराने 22.51 टक्के ने जास्त दरावर काम करण्याची इच्छा दर्शविली आहे. या दराची तुलना डी.एस.आर. 2010–2011 चे दरसुची प्रमाणे केल्यास 2.0 टक्के ने कमी आहे.

सबब, निम्नतम निविदाकार मे.आर.एम. गोपलानी यांची 2.0 टक्के ने कमी असलेली (2010–2011 चे दरसुची प्रमाणे) रु. 3,82,65,244/– ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 17</u> :– मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

–: <u>ठराव</u> :–

म.न.पा. सभागृहाद्वारे सन 2011–2012 चा अर्थसंकल्प मंजूर करितांना अर्थसंकल्पात विविध विकास कामा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या राशीचे विविध विकास कामाकरिता प्रावधान (तरतुद) देण्याचे अधिकार म.न.पा. सभागृहाने स्थायी समितीस प्रदान केले आहे.

करिता वेगवेगळया महसूली व भांडवली पदाअंतर्गत स्थायी समितीस दिलेले प्रस्तावित कामांना क्षेत्रीय अर्थसंकल्पातील नमुद केलेले विकास कामाचे पदे सोडून उर्वरित विकास कामाच्या प्रस्तावित कामांना तरतूद देण्याचे अधिकार ही स्थायी समिती मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते.

सुचक :– हस्ता/– दिपक पटेल
अनुमोदक :– हस्ता/– बाबा मैंद,
हस्ता/– सुधिर राऊत
हस्ता/– भारतभूषण गायधने
हस्ता/– मंदाताई लेंडे
हस्ता/– सौ. उषा बोहरे
हस्ता/– अरविंदर पालसिंग
हस्ता/– प्रविण सांदेकर
हस्ता/– मो. कामील अंसारी
हस्ता/– डॉ. मिलींद माने
हस्ता/– राहूल तेलंग
हस्ता/– अरुण डवरे
हस्ता/– सौ. कल्पना डवरे
हस्ता/– झूल्फेकार अहमद
हस्ता/– सौ. सिंधू उईके.

<u>ठराव क्रमांक 18</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर